# गडावरील व्यक्ती हाती घेतले म्हणजे लोकं आपली होत नसतात !!

## पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा रोख कोणाकडे? राज्यभर चर्चा

बीड | दिव्य न्युज

राजकारण आणि धर्मकारणात नाते हवे असते. राजकारणात काम करणाऱ्यांनी धर्मात हस्तक्षेप करू नये आणि धर्मामध्ये काम करणाऱ्या व्यक्तीने वैराग्य धारण केल्याशिवाय तो धर्मामध्ये विराजमान होऊ शकत नाही. गडावरील एखाद्या व्यक्तीला हातात घेतले म्हणजे गड आणि तेथील लोक आपली होत असतील असे कोणाला वाटत असेल, पण आपल्याला तसे वाटत नसून मला गडावरील लोक आपली वाटतात म्हणून आपण तिथे जात असतो, असे विधान पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी केले. या विधानावरून त्या पुन्हा चर्चेत आले आहेत पाटोदा तालुक्यातील महासांगवी येथे सोमवारी त्या बोलत होत्या त्यांच्या या विधानाचे अनेक अर्थ काढले जात असून पंकजा मुंडे यांचा रोख कोणाकडे असा प्रश्नही या निमित्ताने उपस्थित केला जात आहे.



### चर्चा रंगून त्यावरुन वाद ही निर्माण झाला होता!

● अलीकडेच अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी भगवानगडावर जाऊन महंत डॉ. नामदेव शास्त्री सानप यांची भेट घेतली आहे.

● त्यावर डॉ. शास्त्री यांनी धनंजय मुंडे हे दोषी आहेत, असे वाटत नाही हे विधान केले होते. त्यांचे हे विधान धनंजय मुंडे यांना निर्दोष ठरवणारे असल्याची चर्चा रंगून त्यावरून वाद ही निर्माण झाला होता.

● हाच संदर्भ पंकजा मुंडे यांच्या विधानामागे असल्याची चर्चा त्यांच्या वरील वक्तव्यावरून सुरू झाली आहे.

### भगवान बाबांवर आरोप होताच शिक्षा करून घेतली!

● याप्रसंगी पंकजा मुंडे म्हणाल्या भगवान बाबांनी स्वत:च जीवन समाजाला दिलं तेवढं सोपं नाही परंतु काही लोकांनी आरोप केले तेव्हा स्वत:चे तत्व व स्वत्व जपण्यासाठी बाबांनी स्वत:ला मोठी शिक्षा करून घेतली, स्वत:चे स्वत्व त्यांनी जपले.

### राजकारणात आणि धर्मकारणात एक अंतर राखले पाहिजे!

● पाटोदा तालुक्यातील महासांगवी येथील धार्मिक कार्यक्रमात बोलताना त्यांनी महंत राधाताई आईसाहेब यांची स्तुती केली. त्यांच्याशी असलेल्या सलोख्याचा संदर्भ देऊन पंकजा मुंडे म्हणाल्या, राजकारणात आणि धर्मकारणात एक अंतर राखले पाहिजे.

● शिवाजी महाराजांपासून आपण पाहत आलो आहोत की राजसत्ता आणि धर्मसत्ता हातात हात घालून चालत असते. पंकजा मुंडे यांनी कुंभमेळा आणि त्याच्या व्यवस्थापनावरून मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची स्तुती केली. सोबतच तेथील गंगेत डुबकी मारण्यावरी टिप्पणी केली.

## मुंबईत अग्नितांडव! ओशिवरा येथील लाकडाच्या गोदामाला आग

मुंबई : मुंबईतून एक मोठी बातमी समोर आली आहे. मुंबईतल्या ओशिवरा येथील लाकडाच्या गोदामाला भीषण आग लागली आहे. या आगीत कोणतीही जीवित हानी झाली नसून मोठ्या प्रमाणात वित्त हानी झाली असल्याचं समोर आलं आहे. घटनास्थळी अग्निशमन दलाच्या गाड्या दाखल झाल्या आहेत.

जोगेश्वरी येथील ओशिवरा परिसरात असलेल्या लाकडाच्या गोदामाला आज सकाळी भीषण आग लागली आहे. १० ते १२ सिलेंडरच्या स्फोटामुळे ही आग लागल्याची माहिती मिळाली आहे. या आगीची झळ आजूबाजूच्या दुकानांना लागली असून मोठ्या प्रमाणावर वित्त हानी झाली आहे.

आग आटोक्यात आणण्यासाठी घटनास्थळी अग्निशमन दलाच्या गाड्या दाखल झाल्या आहेत. दरम्यान पोलिसांनी या घटनेबाबत अधिकचे तपास करण्याचे निर्देश दिले आहेत. या घटनेमुळे येथील वाहतूक संथ गतीने सुरु आहे.






## पखालीला इंजेक्शन भरपूर झालेत आतातर डायरेक्ट हाल्याला ढोस देऊन टाका–शेख अजिमोद्दीन

### उपकार्यकारी अधिकारी यांच्याकडे प्रतितास ५०रूपये नुकसानभरपाई चे अर्ज करावे

दौलावडगाव / दिव्य न्युज

आष्टी तालुक्यात महावितरण कंपनीत तूघलकी कारभार सुरू आहे. राज्यकर्त्यांना याचे सोयरसुतक नाही.उलट राजाश्रय आहे कि काय हेच कळत नाही.घरगूती विज ग्राहकांना पूर्ण क्षमतेने चोवीस तास विज पुरवठा देणे बंधनकारक आहे. तसेच कृषी पंपाना पूर्ण क्षमतेने आठ तास विज पुरवठा देणे बंधनकारक आहे.मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक २५जूलै २०२४नूसार शासनाने राज्यातील ४४ लाख ३ हजार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या शेतीपंपाना पूर्णत: मोफत विज पूरवली जाईल याकरिता १४ हजार ७६० कोटी रूपये महावितरण कंपनीला देण्यात आले आहेत.म्हणजेच शेतकऱ्यांनी आपले विज बील भरले आहे.महाविरण कंपनीचे शेतकऱ्यांचे विज बील आज रोजी शून्य रूपये आहे व यापूढेही शून्यच राहणार आहे.शेतकऱ्यांना शून्य वीज बील वाटपासाठी सबस्टेशन मध्ये विज बील आले होते परंतु ते वाटप केले गेले नाही.ऑनलाईन आपला ग्राहक नंबर टाकून आपले शून्य विज बील प्रत काढता येते.पिम्पळा सबस्टेशन मधून व तसेच तालुक्यातील जवळपास सर्वच सबस्टेशन मधून अत्यंत कमी दाबाने वीज पुरवठा केला जात आहे. पिंम्मळा सबस्टेशन मधून घरगुती विज पुरवठा सिंगल फेज बंद करण्यात आला आहे.शेतीपंपाना अत्यंत कमी दाबाने व मनमानी पध्दतीने वेळेत बदल करत विज पुरवठा केला जात आहे.सबस्टेशनमध्ये अधिकृत कर्मचारी हजरच राहत नाहीत जिसकी लाठी ऊसकी भैंस अशी परिस्थिती आहे.सबस्टेशनचा अधिकृत मोबाईल नंबर बंद करून ठेवला आहे.ज्यूनिअर अभियंता धानोरा व उप कार्यकारी अभियंता आष्टी हे सामान्य शेतकऱ्यांचे फोन उचलत नाहीत. अभियंते उंटावरून शेळ्या हाकत आहेत. राजकिय नेते याबाबत या अभियंत्यांना जाब विचारत नाहीत.तरी आता निवेदन, आंदोलन करून पखालीला इंजेक्शन देण्याऐवजी शेतकऱ्यांनी आपले विज बील आता भरलेले आहे व आपण आता थकबाकीदार नाहीत. तसेच घरगूती विज ग्राहकांनी व शेतीपंपधारकांनी आता एकत्रित येऊन उप कार्यकारी अभियंता आष्टी यांचे कडे शेती पंपाना कमी दाबाने वीज पुरवठा केला व पूर्ण आठ तास विज पुरवठा केला नाही म्हणून विज कायदा२००३ नूसार प्रति तास ५० रूपये या प्रमाणात नुकसान भरपाई द्यावी. म्हणून रितसर अर्ज दाखल करून पोहच घ्यावी व त्याचप्रमाणे घरगूती विज ग्राहकांनी अत्यंत कमी दाबाने व २४ तास विज पुरवठा केला गेला नाही म्हणून आपला अर्ज उपकार्यकारी अभियंता कडे करा अर्जात आपला ग्राहक नंबर व मोबाईल नंबर जरूर टाकावा. विज वितरण कंपनीचे कर्मचारी तूमचे आकडे आहेत हे सांगताना दिसतात त्यांना घाबरून जाऊ नका महावितरण कंपनीने आता सर्व शेती पंपाचे विज कोटेशन भरून घेतले पाहिजे जेणेकरून कंपनीला त्या शेतकऱ्यांचे शासनाकडून विज बील मिळेल व कंपनी अधिक नफ्यात येईल .



विज पूरवठा सूरळीत हवा असेल तर आता पखालीला इंजेक्शन देण्याऐवजी हल्यालाच ढोस देऊन मारले पाहिजे. शेती पंपधारक व घरगुती विज ग्राहक या सर्वांना विनंती आहे की आपण विजेच्या मनमानी कारभाराला आळा घालण्यासाठी उपकार्यकारी अभियंता यांचेकडे प्रती तास ५०रूपये नूकसान भरपाई द्यावी म्हणून रितसर अर्ज दाखल करून त्याची प्रत शेतकरी संघटनेकडे द्यावी.शेतकरी संघटना हे सर्व अर्ज घेऊन उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा मानस आहे . महावितरण कंपनीला कूणाचे अभय हे माहीत नाही . तरी कृपया जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी अर्ज दाखल करून शेतकरी संघटनेकडे एकप्रत जमा करावी असे आव्हान शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष शेख अजिमोद्दीन केले आहे.

## रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा परळीत शायान क्लिनिकच्या भव्य उद्‌घाटन सोहळा



परळी / दिव्य न्युज

आज दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी परळी शहरातील मलिक पुरा भागात डॉ इम्रान सर यांच्या शायान क्लिनिकच्या भव्य उद्घाटन सोहळा संपन्न झाला. परळी येथील सुप्रसिध्द कॉन्ट्रॅक्टर हाजी युनूस सहाब यांचे चिरंजीव डॉ इम्रान सर यांच्या नवीन रुग्णालय (शायान क्लिनिक) च्या उद्घाटन सोहळा आज दुपारी २:३० वाजता हाजी युनूस सहाब, मौलाना मुकरम सहाब आणि हाजी बाबु भाई मिस्किन यांच्या हस्ते झाला आहे.या रुग्णालयाच्या माध्यमातून डॉ. इम्रान दांपत्याच्या हातून रुग्णसेवेचे पुण्य घडावे,चांगल्या सेवेसाठी रुग्णालय नावारूपाला यावे अशा शुभेच्छा याप्रसंगी उपस्थित यांच्या वतीने दिलं गेलं आहे.

डॉ इम्रान सर यांनी औरंगाबाद येथे ०५ वर्षे रुग्णांची सेवा केलीली आहे आणि सौ. इम्रान यांनी परळी शहरातील प्रसिद्ध डॉक्टर अर्शद सर यांच्या कडे १ वर्षे रुग्णांची सेवा केलीली आहे.या मुळे दोघांना पण चांगला अनुभव आहे. डॉ इम्रान सर यांनी BHMS MD (Homoeopathic) ची डिग्री घेतलेली आहे सौ. डॉ इम्रान यांनी BHMS (MUHS Nasik) मधून आपली डिग्री पुर्ण केलेली आहे. या क्लिनिकच्या माध्यमातून परळी शहरातील व परिसरातील नागरिकांची सेवा करण्याच्या दृष्टीने आम्ही क्लिनिकची सुरुवात केली आहे असा डॉक्टर इमरान यांचे वडील हाजी युनूस सहाब यांनी सांगितले आहे. या रुग्णालयाच्या उद्घाटनानंतर शुभेच्छा देण्यासाठी उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर सर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नायब तहसीलदार पठाण मॅडम, नायब तहसीलदार रुपनर सर यांनी भेट दिली होती. शेवटी या उद्घाटन समारंभामध्ये शुभेच्छा देण्यासाठी परळी शहरातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी, शासकीय अधिकारी कर्मचारी, डॉक्टर्स आणि सर्व नागरिकांचे आभार शेख शाहेद, शेख अखील, शेख वसीम,डॉक्टर इम्रान सर आणि जनता ट्रेडर्सचे मालक अरबाज शेख यांच्या वतीने व्यक्त करण्यात आलं आहे

## पोदार जंबो किड्सचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

### ‘राष्ट्राच्या भावना’ या विषयावर विद्यार्थ्यांचे सादरीकरण

जिंतूर / दिव्य न्युज : सालेह चाऊस

जिंतूर येथील पोदार जंबो किड्सच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. लहानग्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक आणि कलात्मक सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली. ‘राष्ट्राच्या भावना’ या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात देशभक्तीपर गीत, नृत्य आणि नाट्यछटांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी देशप्रेमाचे अनोखे दर्शन घडवले.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सादरीकरणासोबतच पालकांनीही आपल्या मुलांच्या टॅलेंटला दाद दिली. प्रमुख पाहुणे म्हणून नेमिनाथ दंडवते (मुख्याधिकारी, नगर परिषद, जिंतूर), अनिल समिंद्रे (उपमुख्याधिकारी, नगर परिषद, जिंतूर), केंद्रप्रमुख के. सी. घुगे, माजी नगरसेवक तथा नगर परिषदेचे गटनेते ड. गोपाळ रोकडे, गणेश कुन्हे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात शिक्षणाधिकारी प्रा. विठ्ठल भुसारे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. संस्थेच्या प्राचार्या इंजि. आशा दराडे यांनी आपल्या प्रास्ताविकातून विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला आणि शिक्षक व पालकांचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दीपिका मोहारे, सुरेखा काळे, सुनीता घुगे, उषा चट्टे, वर्षा कांदे यांनी विशेष परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्साह आणि पालकांचा अभिमान स्पष्टपणे दिसून येत होता. या भव्य कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असून त्यांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळाले. पोदार जंबो किड्स, जिंतूरने स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या भावी विकासासाठी भक्कम पाऊल टाकले आहे.

‘विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संपूर्ण शहराची आवश्यकता!’ – नेमिनाथ दंडवते

यावेळी बोलताना मुख्याधिकारी नेमिनाथ दंडवते यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संपूर्ण शहराने योगदान देण्याची गरज व्यक्त केली. विद्यार्थ्यांचा विकास हा केवळ शाळेपुरता मर्यादित नसतो. त्यासाठी संपूर्ण समाज आणि शहराचा सहभाग महत्त्वाचा असतो. समृद्ध शैक्षणिक वातावरण, योग्य सुविधा, प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वे आणि सकारात्मक सामाजिक वातावरण विद्यार्थ्यांच्या वाढीस चालना देतात, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## इस्लामीया दारुल उलूम येथे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन

### तीन विद्यार्थी हाफिज पदवीने होणार सन्मानित







दौलावडगाव/ दिव्य न्युज

आष्टी शहरातील जामा मस्जिद परिसरात मागील चाळीस वर्षांपासून अविरत सुरू असलेल्या इस्लामीया दारुल उलूम या मदरसा मध्ये सालाबादप्रमाणे यंदाही गुरुवार दि.१३ रोजी सायंकाळी ७ वा. औरंगाबाद येथील सफ़ा बैतुल मालचे अध्यक्ष मुफ्ती प्रोफेसर अनीसुर रहमान यांच्या अध्यक्षतेखाली स्नेहसंमेलन (जलसा) आयोजित करण्यात आला असून इस्लाम धर्मातील पवित्र कुराण पाठ करून शिक्षण पूर्ण केलेल्या तीन विद्यार्थ्यांना हाफिज ही पदवी देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. इस्लाम हा शांती, बंधुता आणि एकतेचे संदेश देणारा धर्म आहे. मदरश्यात या नैतिक मूल्यांचा अभ्यास त्याचबरोबर पवित्र कुराण या आस्मानी ग्रंथाचे पाठांतर करून हाफिज ही पदवी घेतली जाते. आष्टीतील इस्लामीया दारुल उलूम या मदरसा मध्ये आजतागायत हजारो विध्यार्थी हाफिज पदवी घेऊन समाजात धर्माचा प्रचार आणि प्रसार करत आहेत. यावर्षी मदरश्यात पन्नास एवढी विद्यार्थी संख्या आहे. यापैकी मोहम्मद इम्रान सय्यद, रा.कडा,अनवर निसार पठाण,रा.मेहकरी, जमील सलीम पठाण,रा.भाळवणी या तीन विध्यार्थ्यांनी इस्लाम धर्मातील पवित्र कुराण या आस्मानी ग्रंथाचे पाठांतर यशस्वीपणे पूर्ण केले असुन यांना हाफिज ही पदवी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बहाल करण्यात येणार आहे. इस्लामीया दारुल उलूम या ठिकाणी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना धार्मिक शिक्षणासोबत मराठी, गणित, इंग्रजी तसेच कॉम्प्युटरचे शिक्षण अगदी मोफत दिले जाते. यासाठी शिक्षकांची नियुक्ती केली असून अत्याधुनिक अशी कॉम्प्युटर लॅब देखील मदरश्यात उभारण्यात आली आहे. याचप्रमाणे शासनाच्या नियमावली प्रमाणे मस्जिद आणि मदरसा परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे ही बसवण्यात आले आहेत. इस्लामीया दारुल उलूम ही संस्था पूर्णपणे स्वयंअर्थ सहाय्यीत असून समाजातील दानशूर व्यक्तींनी दिलेल्या देणगीतून सुरू आहे.उर्दू ता.१५ शाबान १४४६ हि. गुरुवार दि.१३ रोजी सायं.७ वा. इस्लामीया दारुल उलूम, जामा मस्जिद आष्टी याठिकाणी होणाऱ्या वार्षिक स्नेहसंमेलनात (जलसा) जास्तीत जास्त संख्येने उपस्थिती राहून कार्यक्रमाचा आस्वाद घेण्याचे आवाहन आयोजित समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

दिव्य वार्ता
मंगळवार ११ फेब्रुवारी २०२५


## मराठा समाजाने शिस्तीने लाखोंचे मोर्चे काढले, कुठला न्याय मिळाला ? जितेंद्र आव्हाड यांचा सवाल

मुंबई । दिव्य न्युज

भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर मराठ्यात फूट पाडता अशी टीका केली आहे. यावर जितेंद्र आव्हाड यांनी मी कोणाला उत्तर देण्यास बांधील नाही. मी कोणाच्या सुपाऱ्या घेऊन स्वतःचा राजकीय स्कोर सेटल करायचं काम करत नाही आणि सोमनाथ सूर्यवंशीच्या आईनेचे उत्तर दिलं ते स्पष्ट उत्तर होतं, महाराष्ट्राच्या माऊलीचे उत्तर होतं, पोटचा गोळा गेल्यानंतर तिच्या मनातल्या वेदना तिने बोलून दाखवल्या. जी माणसं बोलत होती

►► पान २ वर



# बीड गुन्हेगारी जगतात खळबळ, पिस्तूल परवाने रद्दचा आकडा ५०० पार जाणार; अनेक जण पोलिसांच्या रडारवर

### राज्यभर मोहीम सुरू होणार

बीडमधील शस्त्र परवानांचे प्रकरणानंतर राज्यात अशी मोहीम राबवली जाणार आहे. गृहविभागाकडून पोलिस आयुक्त, अधीक्षक यांना तशा सूचना केल्या आहेत. अनावश्यक असलेल्यांकडील शस्त्र परवाने रद्द करा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यात ही मोहीम लवकरच सुरू होणार असल्याचे सांगितले जात आहे.

### पाठपुराव्याला यश

जिल्हयातील चने, फुटाने प्रमाणे शस्त्र परवाना दिल्याचे प्रकरण सर्वात आगोदर चव्हाट्यावर आले त्यानंतर मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली.

शस्त्र परवान्यांचा मुद्दा हिवाळी अधिवेशनात गाजला जिल्हयातील शस्त्र परवाने रद्दची कारवाई हाती घेण्यात आली.

बीड । दिव्य न्युज

जिल्ह्यात वाढलेल्या गुन्हेगारीवर भाजप आमदार सुरेश धस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार संदीप क्षीरसागर, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सातत्याने पाठपुरावा करताना अनेक खुलासे केले. पिस्तूल परवाना खैरात असल्यासारखे वाटण्यात आले होते. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या लोकांकडे देखील परवाना होते. यातून काही पिस्तुलाबरोबर खेळतानाचे समाज माध्यमांवर व्हिडिओ व्हायरल करायचे.

सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली आणि बीडमधील गुन्हेगारी जगत उघडकीस आले. यानंतर जिल्हा पोलिस दल आणि जिल्हाधिकारी प्रशासनाने पिस्तूल परवानाधारकांची छाननी सुरू केली. यात आतापर्यंत ३१० जणांचे परवाना रद्द झाले आहे. बीड जिल्ह्यात एकूण १ हजार २८१ पिस्तूल परवानाधारक आहे. गंभीर गुन्हे दाखल असलेल्या २३२ जणांची पिस्तूल परवाना रद्द करण्यात आली आहेत. आता पुन्हा १२७ जणांचे परवाना रद्द करण्यात आलेत. ही कारवाई अशीच पुढे सुरू राहणार आहे. तो ५०० च्या पुढे जाईल, असे सांगितले जात आहे. पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना राबवण्यास सुरवात केली आहे. मकोकानुसार प्रस्ताव तयार करणे, प्रतिबंधात्मक नोटीसा बजावणे, अवैध वाळू, राख वाहतुकीविरोधात कारवाई सुरू केली आहे.




### बीडनंतर आता राज्यभरात मोहीम

बीडमधील शस्त्र परवान्यांचे प्रकरण समोर आल्यानंतर राज्यभरातील माहिती मागवण्यात आले. सर्वच पोलिस अधीक्षक, आयुक्त यांना सूचना करून अनावश्यक परवाने रद्दच्या सूचना देण्यात आल्या. त्याप्रमाणे पुण्यासह इतर जिल्ह्यांमध्ये शस्त्र परवाने रद्द करण्यात आले होते. सध्या ही मोहीम राज्यभर सुरू आहे.

### पाठक, बारगळ, काँवत यांचे स्वागत

परवाना रद्दसाठी सर्वात आधी तत्कालीन पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी पुढाकार घेतला. त्यानंतर नवनीत काँवत यांनीही याचा पाठपुरावा केला. आलेल्या सर्व प्रस्तावांवर तातडीने निर्णय घेऊन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी कारवाया केल्या. त्यामुळे त्यांचे स्वागत आहे.

### १९ जणांच्या प्रस्तावावर आक्षेप

**एवढे** परवाना रद्द झाल्यानंतरही काही लोक परवान्यासाठी अर्ज करतात. गरज नसतानाही अर्ज करणे, गुन्हा दाखल असणे अशा विविध कारणांमुळे मागील दीड महिन्यांत १९ जणांच्या प्रस्तावावर आक्षेप नोंदविला आहे.

**पोलिस** अधीक्षक नवनीत काँवत यांनी याचा निगेटिव्ह अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला आहे. त्यामुळे त्यांना शस्त्र परवाना मिळणार नाही, हे निश्चित आहे.

### आणखी पाच प्रस्ताव गेले

३१० प्रस्ताव पाठविल्यानंतर ते रद्दची कारवाई झाली. अजूनही जिल्हा विशेष शाखेतून सर्वांची माहिती घेऊन प्रस्ताव तयार केले जात आहेत. आणखी पाचजणांचा प्रस्ताव परवाना रद्दसाठी पाठविले आहेत.










## परभणीतील पथविक्रेत्यांना सन्माननीय सुप्रीम कोर्टाने 2014 च्या आदेशानुसार सर्वेक्षण करुन जागा द्यावी व सुरक्षेची हमी द्यावी

### मनपा आयुक्तांकडे निवेदनाद्वारे मागणी



परभणी /दिव्य न्युज : सालेह चाऊस

परभणी शहर महानगरपालिका फेरीवाला समिती सदस्यांच्या वतीने महापालिकेचे आयुक्त यांना सोमवारी (दि.१० ) निवेदन देण्यात आले.

या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, महापालिकेच्या हद्दीतील पथविक्रेता यांना राजकीय उद्देशाने अनधिकृत फेरीवाले ठरवत त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशा आशयाचे निवेदन महापालिका प्रशासनाला देण्यात आले. रोजगारासाठी फेरीवाले स्वतःच्या परिवाराचा उदरनिर्वाह होण्यासाठी रात्रंदिवस राबुन कष्ट करत असतात. परंतु काही राजकीय लोकांनी गरीब व गरजू असणाऱ्या फेरीवाल्या बांधवाविरोधात कठोर कारवाईची भूमिका घेतली. परंतु संविधानिकरित्या हे संयुक्तिक नाही, पथविक्रेत्यांच्या २०१४ च्या सन्माननीय सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार सर्वात प्रथम टाऊन वेल्डिंग कमिटी बनवा त्यानंतर झोन बनवा जर झोन बनविले नाही तर त्या जागेवर त्यांना जशास तसे राहू द्या असे सुचित करण्यात आले आहे जर का त्यांच्यावर जाणीवपूर्वक त्यांच्या जागेवरून त्यांना काढण्याचा प्रयत्न केला तर त्यांना पोलीस संरक्षण द्यावे असे आदेशित असताना जाणीवपूर्व फेरीवाल्यांच्या विरोधात कट कारस्थान करण्याचा प्रयत्न काही राजकीय पुरस्कृत लोकांनी केला

►► पान २ वर

## दत्तमांजरी ता.माहूर येथील सरपंचांना अपात्र घोषित करण्यासाठी विवाद दाखल

श्रीक्षेत्र माहूर / दिव्य न्युजः आदेश बेहेरे

माहूर – तालुक्यातील मौजे दत्त मांजरी येथील विद्यमान सरपंच यांचे सदस्यत्व व सरपंच पद अपात्र घोषित करा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता मनोज किर्तने यांनी विधीज्ञ श्री काकडे यांचे मार्फत जिल्हाधिाऱ्यांकडे केली आहे.

पंचायत समिती चे विस्तार अधिकारी श्री मुरादे यांनी साहेबराव वाघमारे, दयाळु जाधव, बंडु चव्हाण व गावकऱ्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.२०/०६/२०२४ रोजी ग्रामपंचायत मध्ये येवून चौकशी केली. पंधराव्या वित्त आयोगाच्या निधी मध्ये एक लक्ष पंचानव हजार रुपयांचा (१९५०००) अपहार झाला असुन तसा स्पष्ट अहवाल मा. गटविकास अधिकारी माहुर यांना दिला होता. या अहवालाच्या आधारे मा. जिल्हाधिकारी साहेब नांदेड यांचेकडे मनोज किर्तने यांनी विद्यमान सरपंच सुलोचना अर्जुन पवार यांना उर्वरित कालावधीसाठी अपात्र करा, या मागणीसाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४ ( ग) नुसार रीतसर विवाद दाखल केला आहे. सदर प्रकरणात जलद न्यायनिवाडा होणे साठी अहवाल सादर करण्याचे मा. जिल्हाधिकारी यांनी गटविकास अधिकारी माहुर यांना, तहसिलदार माहूर यांचे मार्फत आदेशीत केले आहे. याआधीही तत्कालीन सरपंच सौ. विमलबाई बळीराम पवार यांनी चवदाव्या वित्त आयोगाच्या पंधरा लक्ष त्र्यांनव हजार रुपयांचा अपहार केल्याचा तत्कालीन गटविकास अधिकारी माहुर युवराज म्हेत्रे यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी नांदेड यांना अहवाल देवून गुन्हे दाखल करण्याची परवानगी मागितली होती. दि.१५/०७/२०२४ रोजी जिल्हाधिकारी अभिजित राऊत साहेबांनी तात्काळ कारवाई करण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आदेशित केले होते.तरीही सदर प्रकरण अजूनही न्यायप्रविष्ठ आहे. यात वेळीच गुन्हे दाखल झाले असते तर हा अपहार झाला नसता असेही अर्जात नमूद केले आहे. विद्यमान सरपंच यांचा कार्यकाळ ऑक्टोबर/नोहेंबर २०२२ च्या निवडणुकी पासून सुरू आहे. पण ११/०१/२०२४ पासून पदावर कार्यरत असल्याचा दिशाभूल करणारा दिनांक अहवालात नमूद आहे. जानेवारी २३ ते जुन २०२४ पर्यंत विविध योजनांमध्ये लाखोंचा भ्रष्टाचार झाला असल्याची तक्रार साहेबराव वाघमारे व दयाळू जाधव यांनी गटविकास अधिकारी यांचे कडे केली होती. परंतु पंधराव्या वित्त आयोगाच्या कामाची थातुर मातुर चौकशी मुरादे यांनी केली होती. याही अहवालात अनेक कामात अभिलेख्यात नोंद नाही, कोटेशन नाही, पुरवठा आदेश नाही, अंदाज पत्रक नाही, मूल्यांकन नाही असा शेरा मारला आहे. पुढील सुनावणी दि.१८/०२/२०२५ रोजी जिल्हाधिकारी साहेबांच्या दालनात असून, तात्काळ विषायांकित प्रकरणात अहवाल सादर करण्याचे गटविकास अधिकाऱ्यांना निर्देश आहेत. चार वर्षांपूर्वी च्या गंभीर प्रकरणात अजूनही गावाच्या विकासाचा निधी हडप करणाऱ्या सरपंचावर प्रशासनाकडून गुन्हा दाखल न झाल्याने कसा अहवाल देतात या कडे दत्तमांजरी वासियांचे लक्ष लागले आहे.



## सलीम अध्यक्ष युवा मंच तर्फे आयोजित रक्तदान शिबिरात १५० रक्तदात्यांनी केले रक्तदान!

बीड । दिव्य न्युज

बीड येथील सामाजिक चळवळीतील सक्रिय कार्यकर्ता समाजसेवक सलीम अध्यक्ष युवा मंच तर्फे आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात उत्सुकता प्रतिसाद बीड शहरातील युवगांनी देऊन रक्तदान हेच जीवनदान आहे हे बिद्र वाक्य घेऊन असंख्य युवकांनी

►► पान २ वर






## फॉरेन्सिक; गुन्हेगारांचा फास आवळणार?

### विशेष पथकांकडून घेतले जातात पुरावे

बीड । दिव्य न्युज

नव्या फौजदारी प्रक्रिया संहितेअंतर्गत गुन्हे दाखल होण्याच्या प्रक्रियेत फॉरेन्सिक तज्ज्ञांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीजन्य पुरावे गोळा करणे बंधनकारक आहे. त्यासाठी फॉरेन्सिक वाहनही आहे. त्यासाठी विशेष पथकही कार्यरत आहे. याचे पुरावे गुन्हेगारांविरोधात फास आवळण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहेत. भविष्यात आणखी वाहने वाढणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.

जुलै २०२४ पासून भारतीय दंड संहिता बदलून भारतीय न्याय संहिता लागू झाली. यात सात वर्षांवरील गुन्ह्यांमध्ये फॉरेन्सिक पुरावे घेणे बंधनकारक केले आहे. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्याला वाहनांची तरतूदही केली आहे, परंतु सध्या तरी नवी वाहने बीडला मिळाली नाहीत. राज्यातील धुळे आणि इतर आणखी एका जिल्ह्यात हा प्रकल्प राबविला जात आहे, परंतु आगामी काही दिवसांत आणखी वाहने वाढण्यासह तज्ज्ञही या पथकात सहभागी होतील



### नव्या फौजदारी प्रक्रिया संहितेत तरतूद

२०२४ च्या नव्या फौजदारी संहितेत फॉरेन्सिक वाहनांची तरतूद करण्यात आली आहे.

### परिस्थितीजन्य पुरावे गोळा करणार

**खून, खुनाचा प्रयत्न, अत्याचारासह इतर प्रकरणांमध्ये परिस्थितीजन्य पुरावे या पथकामार्फत जमा केले जातात.**

**हेच पुरावे आरोपींना शिक्षा होण्यासाठी महत्त्वाचे ठरतात, असा दावा पोलिसांनी केला आहे.**






हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०